**"करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास" या योजनेंतर्गत योजनेखालील २२३० १५५५ या मुख्य मुख्यलेखाशिर्षाखाली ५ उद्दिष्टामध्ये १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखालील मंजूर तरतुदीचे पुनर्वितरण.**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**

**शासन निर्णय क्र.कौविउ-२०१६/प्र.क्र.१३८/रोस्वरो-१**

दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०७ मार्च, २०१७

वाचा:-

१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र. रोस्वरो-२००७/प्र.क्र.३०/रोस्वरो-१, दि. ०३ जानेवारी, २००८.

२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र.कौविरोउसं-११ (ग्रंथालय अभ्यासिका)/जाहिराती/(प्र.क्र.११/१६)/१२६६८-६७०, दि. ०१/०९/२०१६.

प्रस्तावना :-

करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास या योजनेंतर्गत योजनेसाठी सन २०१६-१७ मध्ये २२३० १५५५ या मुख्य लेखाशिर्षाखालील १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली रूपये एक कोटी मंजूर तरतुदीपैकी रूपये ८० लाख एवढी तरतुद बीडीएसवर उपलब्ध आहे. रोजगाराच्या संधीची माहिती व मार्गदर्शन बेरोजगार उमेदवारांना उपलब्ध होण्यासाठी तसेच जिल्हा मार्गदर्शन केंद्रात येणा-या बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य स्पर्धा परीक्षांची माहिती देणारी पुस्तके, मासिके इत्यादी उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाने संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ०३/०१/२००८ च्या शासन निर्णयान्वये **"करिअर विषय साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास"** ही योजनांतर्गत योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत मागील वर्षात (सन २०१५-१६) वृत्तपत्रामधून वेबपोर्टलची प्रसिध्दी करण्यात आली असून, त्याबाबतचे खर्च भागविण्यासाठी २६ जाहिरात व प्रसिध्दी हे उद्दिष्ट २२३० १५५५ या मुख्य लेखाशिर्षाखाली उपलब्ध नाही. यास्तव आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाने त्यांच्या संदर्भाधीन क्र २ येथील दिनांक ०१/०९/२०१६ च्या पत्रान्वये करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास या योजनेंतर्गत २२३० १५५५ या मुख्य लेखाशिर्षाखाली १) १७ संगणक खर्च २) २० इतर प्रशासकीय खर्च ३) २६ जाहिरात व प्रसिध्दी ४) २८ व्यावसायिक व विशेष सेवा ५) ३३ अर्थसहाय्य ह्या पाच उद्दिष्टाखाली पुरवणी मागणीद्वारे तरतुद उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने उक्त उद्दिष्टाखाली रूपये १,०००/- प्रमाणे लाक्षणिक पूरवणी मंजूर करण्याबाबत नियोजन व वित्त विभागास प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखालील तरतुद पुनर्वितरण करून, सदर लेखाशिर्षातील एकूण तरतुदीच्या मर्यादेत राहून पुरवणी मागणी मंजूर केली आहे.

२. वरीलप्रमाणे संचालयाने सादर केलेल्या ५ उद्दिष्टाखाली रूपये १,०००/- प्रमाणे लाक्षणिक पुरवणी मागणी मंजूर झाल्याच्या अनुषंगाने तसेच २६ जाहिरात व प्रसिध्दी या उद्दिष्टाखाली झालेला

खर्च भागविण्यासाठी २२३० १५५५ या मुख्य लेखाशिर्षाखालील १३ कार्यालयीन खर्च या एकाच उद्दिष्टाखाली मंजूर झालेल्या तरतुदीचे पुनर्वितरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व वेबसाईट विकास या योजनेंतर्गत २२३० १५५५ या मुख्यलेखाशिर्षाखाली नियोजन व वित्त विभागाने मंजूर केल्याप्रमाणे ५ उद्दिष्टाखाली रूपये १,०००/- प्रमाणे लाक्षणिक पुरवणी मागणीच्या अनुषंगाने तसेच २६ जाहिरात व प्रसिध्दी या उद्दिष्टाखाली तरतुद अपुरी पडत असल्याने, १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखालील मंजूर तरतुदीचे खालीलप्रमाणे पुनर्वितरण करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | मुख्य लेखाशिर्ष २२३० १५५५ खालील उद्दिष्टे | अर्थसंकल्पित अनुदान रूपये (८०% प्रमाणात) | पुनर्वितरण | सुधारित अनुदान रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | १३ कार्यालयीन खर्च | ८०,००,०००/- | - ५०,५६,५००/- | २९,४३,५००/- |
| २ | १७ संगणक खर्च | --- | + १,०००/- | १,०००/- |
| ३ | २० इतर प्रशासकीय खर्च | --- | + १,०००/- | १,०००/- |
| ४ | २६ जाहिरात व प्रसिध्दी | --- | + ०,५२,५००/- | ५०,५२,५००/- |
| ५ | २८ व्यावसायिक व विशेष सेवा | --- | + १,०००/- | १,०००/- |
| ६ | ३३ अर्थसहाय्य | --- | + १,०००/- | १,०००/- |

३. सदर आदेश नियोजन विभागाच्या अनोपचारिक संदर्भ क्र २५७/१४७१ दि.८/११/२०११६ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र २७१ /अर्थ-१८/१६ दि.१६/०६/२०१६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७०३२३१२४८००८२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Samridhi V Angolkar

Digitally signed by Samridhi V Angolkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samridhi V Angolkar
Date: 2017.03.23 12:49:56 +05'30'

**(स. वि. अनगोळकर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.

४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग, का-१४७१, मंत्रालय, मुंबई-३२.
९. कक्ष अधिकारी, रोस्वरो-२, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.निवड नस्ती, रोस्वरो-१.